१९८५
काव्य

# विदूषक

मंगेश पाडगांवकर

REFBK-0015582
REFBK-0015582

पॉप्युलर प्रकाशन मुंबई

# विदूषक

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ...७४३००... वि: ...Cnicct...
क्रमांक ...९८६५... नों. दि. ...२०।३।०७

**मंगेश पाडगांवकर यांची पुस्तके**

धारानृत्य १९५०
जिप्सी १९५३,१९५९,१९६५
छोरी १९५७
निंबोणीच्या झाडामागें १९५४,१९५८
शर्मिष्ठा १९६०
उत्सव १९६२
वात्रटिका १९६३
भोलानाथ १९६४
मीरा १९६५
विदूषक १९६६

# विदूषक

मंगेश पाडगांवकर

REFBK-0015582
REFBK-0015582
मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ९५५८२

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

© मंगेश पाडगांवकर

पहिली आवृत्ती १९६६।१८८८

मुद्रक : वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक : ग० रा० भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ३४ WB

*प्रा० केशव पांडुरंग तथा शांताराम जोग यांस*

प्रेमादरपूर्वक :

पडत्या काळात तुमच्या आधाराने मी उभा राहिलो.

# अनुक्रमणिका


१. जत्रा १
२. म्हैस ३
३. गंज ४
४. खेळ ६
५. बाहुल्या ७
६. देऊळ ९
७. सर ११
८. पूर १२
९. सन्मान्य १३
१०. मंगेश पाडगांवकर : एक दृष्टिकोन १५
११. जीव भरून पहावें १७
१२. स्वगत १८
१३. संथ संथ सरकणारे १९
१४. सोबत २०
१५. ईव्ह २१
१६. सुनीत २३
१७. गाणें २४
१८. गाडीवाला २५
१९. सुट्टी २६
२०. जवळ २७
२१. विदूषक २८
२२. एकटी ३०
२३. नेता ३२
२४. म्हातारा ३४
२५. कबुली ३५
२६. माहेर ३६
२७. आठ ओळी ३७
२८. तिघे ३८
२९. चिंधेबुवा ३९
३०. तात्पर्याची कविता ४१
३१. प्रवासी ४३
३२. वर्ग ४५
३३. निरभ्र ४५
३४. हनिमून ४७
३५. मास्तर ५०

३६. जिवंत ५१
३७. माणूस ५२
३८. कंटाळवाणा दिवस ५३
३९. श्रद्धांजलि ५४
४०. आकाश कसें स्वच्छ
आहे ५५
४१. एक एकटा मुलगा ५७
४२. वसा ५९
४३. खाज ६०
४४. सोयिस्कर ६१
४५. ज्यांचीं हृदयें ६३
४६. शेपटी ६४
४७. उद्देशिका ६७
४८. प्रश्न ६९
४९. इथून जातांना ७०
५०. नांदी ७१
५१. घरें शिडें नसलेलीं ७२
५२. सकाळ ७३
५३. अलीकडे पलीकडे ७५
५४. रोमँटिक ७७
५५. फोड ७८
५६. महावृक्ष ८१
५७. प्रौढगीत ८३
५८. एक मोरू ८४
५९. लगीन ८५
६०. एक टीकाकार :
काल्पनिक ८६
६१. एकामेकांशिवाय ८८
६२. जथ्याजथ्यांनीं ९०
६३. हरवलेला ९१
६४. जेव्हां आपण
प्रेम करतों ९३

लेखनकाल : ६·९·६० ते २१·११·६४

# विदूषक

बौ दि

# जत्रा

किती माणसें इथेंतिथें बुडतात डोळे :
अर्थहीन आवाजांचे हलते पुतळे;
माझ्या इवल्या पावलांहून जमीन लहान :
पाय कुठें ठेवूं ? गळयांत खोल तहान...

लाह्यांचें अंध वादळ स्वतःभोंवतींच भ्रमणारें :
गरगरणाऱ्या आवाजांतच आवाज होऊन घुमणारें;
घट्ट धर ना हात आई हरवून जाईन,
पावलांच्या या प्रवाहांतली सावली होईन...

मग कुठें शोधशील मला ? ओऽहोऽ तिकडे बघा :
लाललाल गोल गुबऱ्या गालांचा रंगीत फुगा;
गरगरणाऱ्या पाळण्यांत या बसवशील ना आई मला ?
आभाळाला लागतील पाय आणि डोकें जमिनीला...

थकले का ग तुझे पाय ? बोलत कां नाहींस तूं ?
सुकले का ग तुझे ओठ ? हंसत कां नाहींस तूं ?
ते बघ ते बघ मजेदार चणे गरम,
लाल मिरची, पिवळीजर्द लिंबाची फोड नरम.

जादूच्या भिंगाशिवाय सगळ्या गमती दिसतील कशा ?
फांद्यांएवढीं माझी बोटें, राक्षसाच्या दाढीमिशा—
ढणढणणाऱ्या दिवलीच्या चक्करणाऱ्या धुरांत दिसतात...
बोलत कां नाहींस तूं ? पावलें कां हीं जड पडतात ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ९५५८२

जांभयांच्या चक्री पाळण्यांत फिरू लागले माझे डोळे,
सावल्या कशा जड होतात दिवेलागणीच्या या वेळे,
भिंतीवरल्या सावल्यांचीं याच वेळीं भुतें होतात...
भोवळणाऱ्या गर्दींत या सांपडेल ना ग तुला वाट ?

हात घट्ट धरला तरी दूर कशी वाटतेस तूं ?
सावल्यांच्या या नदीमधून दूर वाहत जातेस तूं ;
जत्रेचा हा खोल भोवरा, काळोखाचा उंच पहाड
ओलांडूं मी शकणार नाहीं : जवळ असून दृष्टीआड

मुंबई
६.९.६०

# म्हैस

एक म्हैस बसून असते समोर सांचल्या पाण्यांत
संथ संथ रवंथ करीत झुलत अदृश्य गाण्यांत;
थेंब जेव्हां ओघळत असतात खिडक्यांच्या भिंगांवर
फुलासारखा एक कावळा माळून बसते शिंगावर.

कुठल्या जगांत जगते ही ? आवाजही करीत नाहीं.
पावसाहून अर्थसघन डोळ्यांत काळीभोर शाई.
काळ्या बंद अस्तित्वाच्या मठ्ठ पेटींत
कसलें गाणें झुलत असतें ? खोलपणा कसा दिठींत ?

पलीकडच्या रुळांवरून धूर ओढीत जाणारी
दिसत नाहीं गाडी हिला आणि गर्दी लोंबणारी ?
थांबलेल्या काळामधें खोदलेल्या शिल्पासारखी
कालातीत जाणीव घेऊन सभोवतालला असते पारखी.

“पलायन” म्हणतो अशा जगण्याला, शेजारचा
डबक्यामधला एक बेडूक तारवटलेल्या डोळ्यांचा :
काळ्या बंद अस्तित्वाची मठ्ठ पेटी
अचल उरते, अधिकच खोल होते दिठी.

जुनाट मळक्या कांबळ्यासारख्या आकाशांतून
येतात धारा नागमोडी गर्दी करून :
तिक्तिक् काळ्या अंगावरतीं थेंबांचीं फुलें होतात,
काळ्याभोर शाईमागें कसलीं गाणीं झुलत असतात ?

मुंबई
१२·९·६०

# गंज

डोळ्यांवर गंज चढतो :
झाडें 'नेहमींचीं' होतात;
आणि पांखरें 'रोजचींच'
पंखांमुळें उडूं लागतात.

मिठीलाही गंज चढतो
संवयीच्या रात्रीचा :
विश्वासाला आधार पुरतो
फक्त मिटल्या खिडकीचा.

शब्दांवर गंज चढतांच
भाव येतो गाण्यांना :
बुडबुड्यांची रंगीत गर्दी
खुर्षीत फेकते नाण्यांना.

आचार्यांना गंज चढतो
अध्यात्माच्या भाषेचा :
प्रवचनांच्या कफनीमागें
वास कुबट आशेचा.

आत्म्याला गंज चढतांच
सिंहासनें जवळ येतात;
लाकडाच्या मठ्ठ खुर्च्या
मऊ तेलकट सलाम करतात.

गंज चढतो यांना आणि
गंज चढतो त्यांनाही;
गंजाचा कारखानदार
आज कधींच तोट्यांत नाहीं.

मुंबई
१३.९.६०

# खेळ

सावल्यांनीं वेढीत वेढीत जमतात झाडें
गडद एकत्र, माझ्याभोंवतीं.
धस्स कोसळण्याचा आवाजच : लाट नसते,
नीज दचकून डोहांत फसते...

काजव्याची अर्थहीन तरल वेलांटी
आपल्याच प्रकाशांत अक्षर शोधणारी;
विझल्या वातींचे दिशाहीन दिवे
वाहत असतात अंधारनदींत अंध थवे.

लख्ख आरशांसमोर थरारत फिरणारा
चित्रविचित्र कवडशांचा गतिमान फेर
कधींच काळोख झाला. अजून किती वेळ
जपून ठेवूं बांगड्यांच्या तुकड्यांचा रंगीत खेळ ?

सावल्यांनीं वेढीत वेढीत जमतात झाडें
गडद एकत्र, माझ्याभोंवतीं...

मुंबई
८·१०·६०

# बाहुल्या

आजीसारखें वांकलेलें देवचांफ्याचें जुनें झाड.
खारीसारख्या चपळ वाटा. गस्तवाले घुमे माड.
हिरव्यांतून उडणारी निळ्या पिसांची भिंगरी तान.
कापलेल्या कलिंगडांतलें सूर्यास्ताचें ऊन भान.
आजोबांच्या पूजेसाठीं वेचलेलीं ओलीं फुलें.
माजघरांतल्या अंधारांत मन उदास झुरलेलें.

लाललाल भरतीवर चंद्राचें झुलतें फूल.
डोळ्यांच्या कळ्यांतून आळसलेली गोड भूल.
तांबूस कोवळया देठांच्या त्या शपथा टपटपणाऱ्या :
शब्दांमागचें निळें तळें सुगंधानें मंतरणाऱ्या.
प्राणांवर कोसळणाऱ्या रक्ताच्या अनावर लाटा,
उद्रेकाच्या अंधारांत जेव्हां हरवून गेल्या वाटा,
जेव्हां त्याला विवशतेंत समजलें खूप कांहीं,
लळा लागल्या पांखरासारख्या जवळ आल्या दिशा दाही.

जिवंत साऱ्या क्षणांच्या कां, कशा बाहुल्या झाल्या ?
हंसण्याची अन् रडण्याची कळही हरवून बसल्या :
चावीच्या हृदयांतही दिलासा असतो थोडा,
पापणीहून जवळ आला आतां काळोखाचा घोडा,
छपराच्या केसांतून गार अंधार गळतांना,
घट्ट मिटल्या ओठांतली जीभ कडू होतांना
प्रत्येक कोवळ्या क्षणांतून त्याला दिसली उगवतांना
अटळ भिंत : नजरेहून उंच होत जातांना.

सावल्यांचे लांब पाय काळोखांत बुडून गेले,
एकटक बघतां बघतां डोळ्यांचेच खडक झाले.

मुंबई
२२·१२·६०

# देऊळ

बगळ्याहून शुभ्र कपडे,
शब्दांत संस्कृतीचा धूप,
साधा वेष, उच्च विचार,
काळे पैसे खिशांत खूप.

कालच आणल्या मुलीनें
काश्मीरहून उंची साड्या;
या वर्षीं मुलानें
घेतल्या दोनच नव्या गाड्या.

साधी रहाणी, उच्च विचार
असें घरांत बाळकडू;
जगांतला अधर्म बघून
याला येतें टचकन रडूं.

भूदानाला सहज दिली
शंभर एकर नापीक जमीन :
तरी तिकीट मिळालें नाहीं :
निवडणुकीचें तंत्रच हीन.

काळे पैसे वाढत होते,
नाहीं झालें पुण्य क्षीण,
जगे फक्त द्राक्षांवर,
सफरचंदें दोनतीन.

मधाहून वाणी गोड :
कधींसुद्धां कोपला नाहीं;
प्रार्थना केल्यावांचून
एकदांही झोंपला नाहीं.

एक दिवस चार लाख
शाळेला दान दिले;
लाखों खर्चून नाक्यावर
रामाचें देऊळ बांधलें.

माझी आजी दंतहीन
वाती वळून देवळांत जाई,
म्हणे : "असा पुण्यवान
इसम कधीं झाला नाही."

मुंबई
३१·१२·६०

# सर

मऊ ओलेत्या पिसांची
तारेवर बाराखडी;
एक भिऊभिऊ सर
डोळे उन्हांत उघडी.

लख्ख पांढऱ्या ढगाला
जसें शिंपल्याचें मन;
उतूं जात्या तृणीं झुके
ओल्या उन्हाची मालन.

ढोर मिटून घे डोळे
येतां सावरीची सर :
आणि पाहतां पाहतां
पाकळ्यांचें झालें घर.

सावरलें ऊन जरा
पण पुन्हां आली सर :
मऊ ओलेत्या पिसांची
उडे बाराखडी वर.

मुंबई
१५·१·६१

# पूर

सताड उघडें रात्रीच्या बागेचें फाटक,
शब्दहीन ये वाहत वाहत पूर तमाचा,
कसा देवळाजवळुन आतां पक्षी गावा ?
जरि गाता तरि बुडून जाता सूर तयाचा.

अंध काजळी पाण्यावरतीं वाऱ्यावांचुन
टपकन् पडतें गळून अगतिक पान अनामिक;
बाळमुठींपरि मनें फुलांचीं मिटलीं आतां,
मधेंच उमटे प्रकाशओली रेघ अचानक.

पाया रोवुनि उभ्या घराच्या अंगावरतीं
घुसळत येतें काळोखाचें विवस्त्र पाणी :
कसा देवळाजवळुन आतां पक्षी गावा ?
जरि गाता तरि बुडलीं असतीं त्याचीं गाणीं.

मुंबई
२४·१·६१

# सन्मान्य

सन्मान्य माणसांचीं मनें सन्मान्य असतात :
कधीं नसतात संस्कृतिविहीन, परंपरा-पोरकीं;
असतात पारखीं अस्ताव्यस्तपणाला कसल्याही,
कुठल्याही : पोमेड चोपडल्या केसांसारखीं.

सन्मान्य माणसांचीं घरेंही सन्मान्य असतात :
कधीं नसतात घेतलेलीं पागडीवांचून,
देतात वाजवून सन्मान्यतेचीच चोख किंमत,
फक्त हिंमत दाखवून तत्त्वचर्चा करतात सूक्ष्मदर्शी.

सन्मान्य माणसांच्या उंचसुंदर घरांभोंवतीं
असते उगवती खरूज फैलावल्या झोपडपट्ट्यांची :
ज्यांत हातभट्ट्यांची उग्रगंध गुंडरक्षित गर्दी,
होते सर्दी म्हणून सन्मान्य रुमाल धरतात नाकाशीं.

सन्मान्य माणसें बुद्धिवादी असतात, घोषवतात :
फक्त जातात शिरडीला नियमित गर्दी करून,
पुण्य जोडून श्रद्धेनें कृतार्थ, तर होतात,
गोळा करतात आटीव दुधावर पोसलेले गब्रू गुरू.

सन्मान्यांचे राष्ट्रध्वज ओढले जातात खालीं
आणि मवाली मनाच्या गल्लीगल्लीवर राज्य करतात;
पण काढतात मात्र संयमशील सन्मान्य विवेकवादी
चुंबनाआधीं नम्र परवानगी आपल्या बायकोची.

सन्मान्य माणसें बिळाबिळांतून जगत असतात
आणि सन्मान्य माणसांना मुलें होतात.

मुंबई
९.२.६१

# मंगेश पाडगांवकर : एक दृष्टिकोन

उघडे पडून बाबा जेव्हां वाचीत असतात
दाढी लावल्या दुधी भोपळयासारखे दिसतात,
वाचतां वाचतां अगदीं तल्लीन होऊन जातात :
पुस्तक हातांत, अर्ध्या तासांत घोरूं लागतात.

पावसाळयांत गमबूट पायांत घालतात
तेव्हां बाबा गोष्टींतले राक्षस दिसतात;
कामाला जातांना आपणच उशीर करतात
आणि मग उगीचच सगळयांवर ओरडत बसतात.

बाबा तसे शूर आहेत : कोणालाच भीत नसतात :
मात्र आई चिडली म्हणजे कसे अगदीं मऊ येतात;
सैंपाकघरांत आई गप्प, बाबा भिऊन बोलत असतात,
आम्ही आंत जातांच मात्र आम्हाला घालवून देतात.

कधीं कधीं बाबा अगदीं लाडांत येतात :
"व्यायाम केलाच पाहिजे" म्हणून फिरायला चला म्हणतात;
टॅक्सींतून घेऊन जातात, टॅक्सींतून परत आणतात
आणि आमच्या निमित्तानें आपण भरपूर भेळ खातात.

"उद्यांपासून शिकवणार" म्हणून जेव्हां आवाज येतो
तेव्हां माझ्या पोटामध्यें भीतीनें गोळाच उठतो;
शिकवीत तर कांहींत नाहींत : आरडाओरड फार करतात,
काळकामाचें गणित येतांच हळूच आधीं उत्तर बघतात.

कधीं कधीं आईशीं मोठमोठ्यानें भांडण करतात,
दुसऱ्या खोलींत एकटेच जाऊन तणतणत झोंपीं जातात;
मी म्हणतों, "भली जिरली, आतां आई बोलणार नाहीं,
खाणावळींत जेवा आतां : उद्यांपासून वाढणार नाहीं."

पहांटे बघतों तर, बाबा आईजवळ दिसतात,
अगदीं खुशाल गाढ झोंपून मजेंत आपले घोरत असतात.

मुंबई
१९.२.६१

# जीव भरून पहावें

जीव भरून पहावें तुला एकदां
रानाच्या बरगड्यांतून पळस पेटतांना,
पाण्याच्या रिकाम्या चेहेऱ्याच्या
शुभ्रशुभ्र कळ्या होतांना.

जीव भरून पहावें तुला एकदां
अनिवार हांक प्राणांत भरून :
मोर अंधाराचा थुईथुई भिजतांना
पिसाऱ्याचें उधळें आभाळ करून.

जीव भरून पहावें तुला एकदां
कळ्यांच्या पहांटे, फुलांच्या सकाळीं;
काजव्यांच्या लिपींतलें झुलतें गाणें
मिटल्या डोळ्यांत ओलावतांना कधीं काळीं.

जीव भरून पहावें तुला एकदां.
जीव भरून तुझें व्हावें एकदां.

मुंबई
१४·३·६१

## स्वगत

न दिसणाऱ्या टांचांखालीं
भरडले जातात निष्पाप डोळे;
इथें अजाण अश्रूसाठीं
पापणीपापणीवर सूळ काळे.

हळुवार जिवाचें गाणें तुझें
थांबव आतां श्वास कोंडून
आणि पुढें चल या वेशीवर
कडू कडू ओठांतली थुंकी फेकून.

गुंतल्या झिंज्यांतल्या असह्य उवा
आणि ओठमिटले लाचार भोग;
घराघरावर जरब काळी :
अनेक रात्रीं हें एकच सोंग.

स्तनांतला पान्हा चोखण्याआधीं
कोवळ्या उरांत घुसलेला बाण;
गाण्यांची लाळ होतांना
पिचल्या कण्याचा डोळ्यांतला ताण.

तळवा नसलेले बूट अभाग्याचे
घट्ट छातीशीं घेऊन
पुढें चल या वेशीवर
आणि तुझ्या सावलीवरही थुंकी फेकून

मुंबई
२१·३·६१

# संथ संथ सरकणारे

संथ संथ सरकणारे पहिलेवहिले पावसाळी ढग :
गढूळ डोळ्यांच्या घरांचे मोर झाले आज अचानक;
ओथंबून आल्या दिशांच्या जांभूळबनांतून फिरूं लागले
तुडुंब हंबर घालीत आंचळदुखरे कासावीस वारे.

संथ संथ सरकणारे पहिलेवहिले पावसाळी ढग :
जसून आल्या आठवणी कोवळ्या मनाच्या सुनीळ देशांतल्या :
सोनचांफ्याच्या गडद वासाच्या ओल्याचिंब आणाभाका,
डोळ्यांच्या आंत आंत घट्ट मिटून घेतलेल्या धुवांधार रात्री.

संथ संथ सरकणारे पहिलेवहिले पावसाळी ढग :
अंग घाशीत सरकणारी काळीभोर उतावीळ;
पानांचे हिरवेगार पोपट होऊन उडूं लागतील अशा वेळीं
झुलूं लागतील झुलूं लागतील हिरवेहिरवे झोपाळे आभाळीं.

संथ संथ सरकणारे पहिलेवहिले पावसाळी ढग :
माझ्याच अंगींचा शहारा समूर्त तशीं झंकारलीं झाडें;
इतकी आध्यात्मिक धुंदी कीं रक्तांतला पशू जागा होऊन
गरमगरम श्वासांनीं उकरून माती गंध भोगूं लागे.

मुंबई
२·६·६१

# सोबत

नाहीं ना आठवत
आठवूं नको मग
दोघांनीं घेतलेलें
लुटून सारें जग...

लुटलें सारें कांहीं
बावऱ्या अंधारांत :
भीतिहि जेव्हां झाली
ओलेती गंधरात...

काळोखापलीकडे
फुललें झाड एक :
अजून सोबत ती
तिथली आणभाक...

मुंबई
५·६·६१

# ईव्ह

लाटांच्या फुगीर झग्याशीं झोंबणारा
तारवटलेल्या रक्ताचा खारट वारा;
लुसलुशीत एक ढग स्तनाकार ओथंबून
क्षितिजाशीं झुकलेला अंग झोकून.

तापलेल्या कानशिलांची थडथड जशी
अंगघुसळी काळीभोर होडी तशी;
काय तुझा केला होता गुन्हा म्हणून
इथें आणलेंस भुलवून मला गर्दींतून ?

घरें सगळीं आपल्या मागें लागलेलीं
अर्ध्यावरच थकलीं, धुक्यांत बुडून गेलीं;
दूर एक आहे-नाहीं असा दिवा,
पेटलेल्या कचकड्याची भुरी हवा.

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. 95482

संस्कारांच्या पायऱ्यांवरून कोसळलों
आणि तुझ्या चिवट मिठींत घट्ट आलों;
ताठर ओलसर वक्षांवर फिरतांच हात
कळ्यांचीं फुलें झालीं अंधारांत...

किती शपथा घातल्यास तेव्हां दंशतीव्र ओठांनीं,
किती विजा जाग्या केल्यास थरथरणाऱ्या बोटांनीं !
सुटणाऱ्या नाडीसारखे ताण सगळे सैल झाले,
हुंकारांचे गर्भ घेऊन श्वास जड होऊन आले.

मींच मला नाकारलें : माझें रक्त होण्यासाठीं,
विजेच्या तीव्र विळख्यांत जन्मांच्या सुटल्या गाठी...
लाटांसारखे हिनकळत ओल्या वाळूंत कोसळलों,
निळानिळा चुरा होऊन एकामेकांत मिसळलों...

मऊ किरमिजी ग्लानीच्या डोहांतून
तरंगतांना मिटले डोळे तृप्त थकून;
खोल गाज लाटांची समजूतदार, प्रौढ झाली :
पांघरूण होऊन दोघांना संथसंथ झाकून गेली...

मुंबई
२३·७ ६१

## सुनीत

रस्त्यावर झोंपलेली गरोदर बाई :
जिवंत कीं गेलेली ठाऊक नाहीं;
दुरूनच बघतों मी असलें कांहीं :
फार जवळ गेलें कीं दिसत नाहीं.

पोटफुगीर मांसाचा मळून गेला एक गोळा
कोणीं तरी घाईघाईंत ओरबाडलेला:
केसाळकाळ्या तलफेला त्या वास असेल विडीचा,
मार्ग घामट इच्छेला रक्ताच्या शिडीचा.

सार्वजनिक इंद्रियांची बेवारशी स्वामिनी,
अनंतकाळची माता ही अमुक-तमुक-कामिनी :
पोलिसाच्या बुटासारखा कठोर रस्ता
ठोकर मारून पुढें जातो बघतां बघतां.

नशीब आज इतक्या लवकर बस आली,
माझ्या मागची एक बाई रांग मोडून पुढें झाली.

मुंबई
२४·७·६१

# गाणें

पिकलेले रंग सगळ्या झाडांवर,
पापणीचा अल्गद्पणा आज उन्हांत;
सायीसारख्या मऊमऊ धुळींतून
एक खार हळूच गेली पळून रानांत...

डोळ्यांतल्या काजळासारखी गार सावली
हळूच झुकली पाण्याच्या आभाळमनांत,
सायीसारख्या मऊमऊ धुळींतून
एक गाणें हळूच गेलें पळून रानांत...

मुंबई
२७-७-६१

# गाडीवाला

गाडीवाला नेईल आज
घरावरून जातांना :
हांक नाहीं घालणार मी
आज तो येतांना.

निळाभोर त्याचा सदरा
पांढरेपांढरेशुभ्र केस :
निळ्या-झुळझुळ फांदीवर
पांखरासारखा उत्सुक फेस.

घुंगुर चांदण्यांत ओले होऊन
निजेंत रिमझिम थरथरतील :
सरींसारखे माझ्या मनांत
रात्रभर बरसतील...

कुठें नेणार ? कशासाठीं ?
मी नाहीं विचारणार :
घरापुढें घुंगुरतांच
काळोखांत उतरणार...

मुंबई
२७.७.६१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वाम
अनुक्रम ७८३०० दि. काव्य
क्रमांक १९८५ नों दि. १०/३/

# सुट्टी

सात दिवसांची सुट्टी डोळ्यांनींच खूप हंसणारी.
मोकळ्या गळ्याची. हलकेच स्वतःशीं गुणगुणणारी.
भुरभुरणाऱ्या केसांसारखा वारा. हवेंत शिरशिरी थोडी.
तांदूळवाळूंत रुतून पडलेली एक निष्काम होडी...

समुद्रपक्ष्यांच्या पावलांची ब्राह्मी लिपी ओल्या रेतीवर.
फेसाचें अडकलेलें एक फूल खडककावळ्याच्या पाठीवर.
ओल्या झुडपांच्या कोवळ्या गर्दीवर वाघझडप लाटांची
आणि मागें परततांना बुजरी ओढ बाळपणींच्या वाटांची...

पाण्याच्या सकाळकोवळ्या मनाचेंच आभाळ घडलेलें.
दूर एक आत्ममग्न शीड क्षितिजांत बुडलेलें.
नग्नसोनेरी एकटेपणांत माझ्या हूंहूं करणारें रुणझुण पांखरूं
मनाच्या माहेरीं मला गेलें घेऊन...पायीं उन्हाचे घुंगरू...

बोबडें बोलत फेसांत आंघोळ करणारा किनारा.
सात दिवसांच्या सुट्टींत मी केसांसारखा भुरभुरणारा...

मुंबई
४·२·६२

# जवळ

अज्ञात हातांतला मंद कंदील
ओळखीचा, ओळखीचा वाटतो :
झाडें पुरून टाकीत जेव्हां
काळोख सभोंवार दाटतो.

पापणी नसलेल्या डोळ्यांसारखी
एकटक शांतता मनावर खिळते,
आणि जमीन विश्वास खुडून
डोळ्यांसमोर उंबरठा गिळते.

अज्ञात हातांतला मंद कंदील
आपल्याच नादांत पुढें जातांना
अबोलतांही बोलत असतो,
जवळ असतो दूर असतांना.

कोवळ्या पाण्यासारखा प्रकाश त्याचा
हलकेंच थोपटतो गाणें गात :
डहाळीनें फुलें घ्यावीं
तसा जवळ असतो त्याचा हात.

मुंबई
१९·३ ६२

# विदूषक

टाळयांचा बेहोष गजर
स्वीकारतांना शेवटीं
त्यानें ढुंगण चांचपलें :
लागली त्याला शेपटी.

भर गर्दीत एकटेपणाचा
जेव्हां जाणवला धाक :
त्यानें कोलांटी उडी घेऊन
ओढलें आपलेंच नाक.

एकदम फुगा फुटावा
तशी गर्दी हंसली :
त्याच वेळीं शेपटीला
त्याच्या मुंगी डसली.

मुखवटे उपसतांना
जेव्हां तुमान फाटली
तेव्हां तर लोकांना
खूपच गंमत वाटली.

झगझगीत प्रकाशांत
काळोखाचीं गांवें :
आपल्याच तिरडीबरोबर
त्यानें चालत जावें

कमरेंत वांकून हंसतांना
जीभ झाली कडू,
हरवलेल्या मुलासारखें
त्याला आलें रडूं :

तो चटकन् माकडासारखी
उडी मारून बसला,
उठून आपल्याच ढुंगणावर
लाथ देऊन हंसला.

मुंबई
२०·३·६२

# एकटी

एकदां कशी कुणास ठाऊक
ती तिलाच विसरली
आणि वेल्हाळ झऱ्यासारखी
शुभ्र शुभ्र घसरली...

तिला भेटला उनाड वारा
हिरव्याहिरव्या वळणाशीं;
लळा दाटून गवती फुलें
आलीं तिच्या चरणाशीं.

तिनें किलकिले करून डोळे
काळीभोर शीळ घातली;
गोष्टींतल्या पऱ्यांसारखी
तिला रंगीत गंमत वाटली.

जांभुळबनांत सावल्यांतून
एकटी एकटी जातांना
हळूच लपून खारीनें
ऐकलें तिला गातांना.

पाण्यांत जांभुळसोनेरी
काळीभोर नाव अडली
तेव्हां ती सावलीसारखी
डोळे मिटून अल्गद पडली.

तिच्यासाठीं जवळ येऊन
पक्षी गाऊं लागला गाणीं :
त्याचे सूर ऐकतांना
तिच्या डोळयांत आलें पाणी.

मुंबई
२०·३·६२

# नेता

(रावसाहेब पटवर्धन यांस)

सोनेरी उन्हांत न्हाऊन झाडांच्या फांद्या झुकल्या,
खिडकीच्या शुभ्र कांचा आंतून फळासारख्या पिकल्या,
तेव्हां तो खालीं आला बागेंत उतरून
पाहूं लागला फांद्या-फुलें एकटाच फिरून.

आईनें लावावें मूल आपल्या उराशीं
तसें त्यानें प्रत्येक झाड जपलें होतें जिवाशीं;
सकाळदुपार खपला होता घालीत त्यांना खतपाणी :
तेच त्याचे शब्द होते, तींच त्याचीं होतीं गाणीं.

जुने दिवस आठवले : ती गर्दी, तो जयघोष,
त्या टाळ्या, तो कैफ, शब्दझिंगलीं मनें बेहोष...
लाखांच्या सभेवर बेदरकार स्वार होऊन
आकांक्षांचे हिरवे मुलूख आला होता स्वैर फिरून.

झिंगलेल्या मनांची पण अचानक कींव आली,
जयघोषाच्या टाळ्यांची त्याच्या कानांत थुंकी झाली,
गर्दीचे रंग विटले, आकांक्षेचा झिजला कणा,
अनिवार बाण यावा तसा आला एकटेपणा.

एकटेपणांत जेव्हां कळली कारुण्याची खोल खूण,
स्वतःलाच फेकलें त्यानें सत्तेच्या शिखरावरून;
"पळपुटा, भेकड" म्हणत लोक लागले त्याच्यामागें
पण उशीर झाला होता : कधींच तुटले होते धागे.

"राष्ट्राला गरज आहे अशा थोर नेत्यांची"
(तेव्हां तो लावीत होता दोन झाडें फुलांचीं.)
"नुकतीच तर झाली आहे स्वातंत्र्याची मंगल नांदी"
(तेव्हां तो जपत होता झाडाची दुखरी फांदी.)

क्षणभर त्याला गंमत वाटली या आपल्या वेडाची.
आज त्याला कळत होती फक्त भाषा झाडांची:
हिरवेंगार त्यांचें बाळसें नजरेनें कुरवाळतांना
सुखाचें पाणी आलें टचकन् त्याच्या डोळयांना...

झाडांनाही खोल कळली त्याची भाषा शब्दांवांचून:
तीं हळूच सळसळलीं त्याच्या डोळयांत डोळे मिसळून.

मुंबई
३०·६·६२

# म्हातारा

मध्यरात्रीं छपरावर दगड यावा
अकस्मात् तशी त्याची हांक येते:
काळोखाच्या चाकाखालीं घरें पडतात,
फांदी फांदी झाडाची लुळी होते...

धुवांधार पावसाच्या कर्कश रात्रीं
एक वेडा अस्ताव्यस्त बरळत जातो :
विस्कटलेले डोळे त्याचे बुडून जातात,
अर्थशून्य आवाजच मागें उरतो...

चेहेऱ्यांचीं भिन्नीं दारें बंद होतात
तरी पण चुकत नाहीं हांक त्याची :
आणि लट्लट् कांपूं लागते दुबळी मान
जिन्याखालच्या घुसमटलेल्या म्हाताऱ्याची.

मुंबई
९.७.६२

# कबुली

कबूल, संपलें आहे सगळें त्राण,
पार झिजली आहे पायांतली वहाण,
संवयीनेंच घालतों देहांत आत्म्याचें वंगण.
लाथ देणार ? हुजूर, तत्पर आहे ढुंगण.

नाक ? तें मात्र आहे अजून शाबूत :
इवलासा गंधही येतो अजून काबूत;
अजून कानांना सगळे सूर कळतात;
त्रास घेतल्यावांचून आपोआप प्रास जुळतात.

वहाण झिजली तरी वाटतें गावेंसें गाणें
तेंही संवयीनेंच कीं काय कोण जाणे !
अजूनही चांदण्याच्या डोहांत वेडावून घसरतों,
झिंगून झऱ्यांच्या झपूर्झांत विश्व विसरतों.

नको ? थांबवतों. तुम्ही म्हणाल तसें.
थांबवतों प्रश्न : कां ? कोण ? कसें ?
तुम्हीच सांगा : उभा राहूं ? पळूं ? रडूं कीं हंसूं ?
तुमच्या इच्छेच्या किसणीवर कुठलीं क्रियापदें किसूं ?

चालतांना रस्त्यावरून नकळत गुंगी चढते
जेव्हां वरून केसांत अज्ञाताची थुंकी पडते;
नको म्हटलें तरीही मनांत घुटमळतें गाणें :
आंतल्या आंतल्या प्रकाशांत थरारतात डाळिंबांतले दाणे.

मुंबई
१३·७·६२

# माहेर

चिंब गवताचा महिना जळचंचळ दिवसांचा.
भाबड्या डोळयांसारखे आरसे गुबगुबीत कुरणांतून.
धूरचिमणी गिरणीची एकटी एकटी उभी.
महिना अंग अंग झाडांचें निथळण्याचा,

धडक देणाऱ्या लाटा कासवपाठीच्या खडकांना
धुडकावीत कोसळण्याचा. धुक्याची गर्द झाडी.
झाडींत अंधुक गलबत. गलबताचें पुसट शीड.
शिडाजवळ पांढरा पक्षी ढगाच्या तुकड्यासारखा.

थंड थंड वारे. विलगतील का घरें
एकमेकांना शिरशिरून ? मऊ कोवळें शेवाळ.
काळेभोर रस्ते. पांखरांसारख्या भिजलेल्या मोटारी.
थेंबांचे सूर वहाणाऱ्या वीजतारा दूरदूरपर्यंत...

चिंब गवताचा महिना अंगअंग निथळण्याचा
निळें आभाळ हिरव्याहिरव्या माहेरीं येण्याचा.

मुंबई
२७.७.६२

# आठ ओळी

इतके दूर होतों ? खरेंच ठाऊक नव्हतें.
रितेंच होतें विणलेलें श्वासांचें घरटें ?
निसर्गक्रमाचीं सोयिस्कर साधनेंच नुसतीं ?
जवळपणांत कधींच घडलें नाहीं मोतीं ?

सांवल्यांच्या अफवांत दोन झाडें उभीं राहिलीं,
पानें झालीं आणि पानें गळून गेलीं :
चंद्र उगवला जेव्हां रिकाम्या फांद्यांमागें
डोळयांच्या बाहुल्यांत कुणीच नव्हतें जागें.

मुंबई
३०.७.६२

# ति घे

एकानें चिंचोळें मन वेंगाडलें,
किटलेल्या दांतांतून धूर सोडला,
चावूनचावून बोथटल्या नखानें
मनाला आलेला एक फोड फोडला.

दुसऱ्यानें जुनाट छत्रीचें कापड
कांट्यानें शिवून सदरा घातला,
पुरुषभर ग्रंथांच्या गठ्ठ्यावर चढून
सावलीवर आपल्याच चिडून मुतला.

ति...ति...ति...तिसरा जिभेनें तोतऱ्या
स्वतःशींच कांहीं वैताग-पुटपुटला :
एक पिंक टाकून सगळ्या जगावर
म्हणाला, "गर्दींत या माझा आवाज कुठला ?"

मुंबई
१८-२-६३

# चिंधेबुवा

पिवळट नखांनीं केस खरखरां खाजवीत,
इमारतींमधल्या गल्लींतून अंग चोरीत
चिंधेबुवा येतो : जसा श्रमिष्ट होऊन चालावा
घाणपाण्याचा ओघळ सार्वजनिक मोरींत...

"चिंधेबुवाऽ चिंधेबुवाऽ चिंधेबुवाऽ
तुमच्या डोकींत किती उवा...किती उवा..."
दगड घेऊन ओरडत धांवतात गल्लींतलीं पोरें,
लाळ हंसत पुढें सरकतो चिंधेबुवा...

सार्वजनिक कचऱ्याच्या पेटीपाशीं थबकतो,
हाडकुळ्या कुत्र्यांना भीत घाण चिवडतो,
सडलेलें टाळून मळक्या कागदांत सांठवतो अन्न,
कचरा चिवडीत चिवडीत चिंध्याही निवडतो.

त्याच चिंध्यांचे कपडे त्याच्या अंगावर,
तीन अक्षरें गोंदलेलीं डाव्या हातावर :
फार पूर्वीचीं : जेव्हां माणसाला माणसाचें नांव होतें :
मळाचे थर जमलेले आतां त्या नांवावर.

कोणी म्हणतात, बाईपायीं डोकें फिरलें;
कोणी म्हणतात, सोंग सारें : चोरून घरांत शिरतो;
मोरूची विधवा आत्या म्हणते : "हल्‌कट मेला
पोरीबाळींना मुद्दामच सगळें दाखवीत फिरतो."

भर दुपारीं घरांच्या कवळ्या तापतात,
चिंधेबुवा उन्हांत भाजत एकटाच हंसतो,
शिळया शेणथाप्यासारखा कचरापेटीशेजारीं
कागद उघडून अन्न खात बसतो...

चिंधेबुवाऽ चिंधेबुवाऽ चिंधेबुवाऽ
तुमच्या डोकींत किती उवा...किती उवा...

मुंबई
१·४·६३

# तात्पर्याची कविता

नांव जगन्नाथ : आठव्या वर्षीं हातीं आली झोळी.
वणवण मागे माधुकरी : मऊ पुरणपोळी
वर्षाकांठीं एकदांच त्याला कधींतरी मिळे :
रुखासुखा घांस एरव्हीं कसाबसा गिळे.

त्वेषानें त्वेषानें त्वेषानें तो शिकला.
रस्त्यानें जातांना अनेकदां थुंकला :
थुंकला सगळया जगावर स्वत:वरच चिडून,
पुस्तकांत अधिकच अधिकच गेला बुडून.

बक्षिसें घेत घेत जेव्हां आला वयांत
सूख देण्यासाठीं त्याचें कोणीच नव्हतें हयात;
मोठाल्या पगाराची त्याला नोकरी लागली :
काळोखांत खरकटीं ढकलूं लागला मागलीं.

श्रीमंताचें एक स्थळ त्याला सांगून आलें.
तत्त्वनिष्ठा : हुंडा नको : तिच्याशींच लग्न केलें;
तरीही सासऱ्यानें एक मोटार दिलीच घेऊन,
चाळीस हजार दागिन्यांचे, बंगलाही दिला बांधून.

मघईपानासारखें आतां मऊमऊ सूख आलें;
जगन्नाथाला टक्कल पडलें; त्याला एक मूल झालें;
तीन बढत्या मिळाल्या; एकूण चार मुलें झालीं;
जगन्नाथाचें पोट सुटलें : आणखी एक बढती आली.

जगन्नाथ डॅडी झाला आणि त्याची बायको ममी :
न चुकतां नेमानें क्लबांत खेळूं लागली रमी;
जगन्नाथ सकाळींच ऑफिसांत निघून जाई
आणि रात्रीं दहा वाजतां फायली घेऊन घरीं येई.

नटूनथटून संवयीनें ती त्याच्याजवळ येई
आणि तुपाळ जिलबीसारखें थुलथुलीत सूख देई;
ती दिवसा रमी खेळे; तो दिवसा काम करी :
त्याचें दोंद अधिकच सुटलें; बँकेंत खूप पैसे भरी.

काम करतां करतां त्याला एक दिवस शिंक आली
आणि हालचाल हृदयाची अचानक बंद झाली.
तात्पर्य : जगन्नाथ टेबलापाशीं तसाच मेला :
झोळी घेऊन आलेला एक माणूस कुठें गेला ?

मुंबई
५·४·६३

# प्रवासी

पहाडाच्या कडेकडेनें चालतांना तो थबकला :
फेकलीं गेलीं बुब्बुळें त्याचीं बाणासारखीं
पलिकडल्या दरींत : खोऽल खोऽल तोऽल जाऊन
कोसळल्यासारखा तो भ्याला, उभा राहिला थरथरून.

क्रूर हिरव्या द्वेषानें पेटलेली विक्राळ दरी
वाघाच्या भुकेसारखी : परजलेले खडकांचे सुळके.
अनावर आकर्षणानें झिंगून त्याला वाटलें कोसळावें,
हिरव्या तीक्ष्ण द्वेषानें पेटत पेटत मिसळावें.

*आतां सूर्य बुडाला. एक पक्षी उडाला.*
*उडतांना झाडाखालून : म्हणाला शीळ घालून :*
*नको थांबूं भाऊ : चल पुढें जाऊं.*

पहाडाच्या कडेकडेनें चालतांना तो पुन्हां थबकला
एका जुनाट देवळापाशीं : इथें देऊळ ? कुणीं बांधलें ?
ध्यानांत मिटल्या डोळ्यांसारखा देवळांत काळोख स्तब्ध.
पाणी जमिनींत जिरावें तसे जिरले मनांत शब्द.

आतां वारा झाडांपाशीं हळुवार झाला
आणि तारे आभाळांत रुजून आले;
चांदण्यांतल्या पाण्यासारखा तो चालूं लागला पुढें :
ध्यानस्थ देवळांसारखे त्याला भासले उंच कडे.

सूर्य कधींच बुडाला.  एक पक्षी उडाला.
उडतांना झाडाखालून : म्हणाला शीळ घालून :
थांब जरा भाऊ : एक गाणें गाऊं...

मुंबई
७.४.६३

# वर्ग

शकूनें मालूला चिमटा काढला; रामूनें दामूला दिला गुद्दा :
त्याच वेळीं मास्तर शिकवीत होते एक महत्त्वाचा मुद्दा
मराठ्यांच्या इतिहासांतला. चिंतूच्या सेकण्डहॅण्ड पुस्तकांत
आधींच असल्यानें चांदबिबीला दाढी हिरमुसला त्याचा हात.

कुसुमच्या मनांत एक गाभुळलेली आंबटगोड चिंच लटकली,
पुस्तक समोर ठेवून ती रानांत दूरदूर एकटी भटकली :
तिच्या नव्या रिबिनीसारखें तिथलें निळेंभोर होतें आकाश,
शाळेबाहेर मिळणाऱ्या आइस्फ्रूट्सारखा तिथला लालगोड प्रकाश.

मधल्या सुट्टीची घंटा ठणाणली रस्ते तापलेल्या दुपारीं :
आइस्फ्रूट, कडक मसालाकैरी, टॉप चिंचाआवळे, गोड सुपारी.
मग सुट्टी संपली. गलका वाढत वाढत बंद झाला.
बाकावरून उड्या मारीत दामू आपल्या जागेवर आला.

पांचव्या तासाला उगीचच सगळे मोठ्यानें हंसले,
शिंत्रेबाईंनीं एकूण सात वेळां रुमालानें नाक पुसलें,
मग वर्गाची खोली झाली लांबलचक जांभईसारखी :
गणितांतल्या आंकड्यांना पेंगून पेंगून येऊं लागली डुलकी.

इतक्यांत बाहेर कर्कर्कश आवाज झाला : मुलें दचकलीं :
बाक सोडून धांवलीं : सुरक्षित गजांच्या खिडक्यांशीं लटकलीं :
बाहेर रस्त्यावर विटा भरलेली लॉरी धांवून अंगावरून
एक माणूस कोणीतरी रक्ताच्या थारोळ्यांत पडला होता मरून.

मुंबई
११.४.६३

# निरभ्र

तिच्या कांहीं रात्री होत्या किडलेल्या,
कांहीं उत्तान झिंगून बिघडलेल्या,
कांहीं फसवून फसलेल्या, चिडलेल्या,
कांहीं खोल जिवाला भिडलेल्या.

मनाच्या मागें खोल आंत आंत
एका जुनाट गंजलेल्या पिंपांत
तिनें ढकलले होते कोळसे विझलेले :
न दिसणाऱ्या अश्रूंत थंड भिजलेले.

पाण्यानें निळें आभाळ ल्यावें
तसें बाळपण तिच्या डोळयांत यावें
एकटेपणीं : तेवढ्यावरच जगत राही,
स्वतःपल्याड नितळ होई.

निरभ्र स्वच्छ स्वच्छ पाणी जसें
एक आयुष्य तिला होतें अगदीं तसें

मुंबई
१२·४·६३

# हनिमून

तो तिला म्हणाला, "आपण हनिमूनला जाऊं :
लग्न झालें तेव्हांदेखील कुठें जाणें जमलें नाहीं."
ती हंसली आणि म्हणाली, "वेडा कुठला!
लग्नाला एकूण झालीं बारा वर्षं.
तीन मुलें पदरांत पडलीं.
तुझ्या कानाकडचे केस
तुरळक तुरळक पिकूं लागले."
चुलीवरच्या वरणाला
तिनें चटकन् फोडणी टाकली,
चपळाईनें परतली
आणि तव्यावरची भाकरी.

मग तिनें मुलांची उजळणी म्हणून घेतली.
धाकट्याला भरवलें. मोठ्याचें उद्यांसाठीं
पाटीदप्तर भरून दिलें. मधलीच्या गादीवरचें
मेणकापड नीट केलें. मुलांचीं जेवणें झालीं.
त्यानेंही धुमसत धुमसत घुम्यानेंच जेवण केलें.

तो गेला बारा वर्षं ओलांडून, खूप मागें, लग्नापूर्वीं :
चिंचेच्या झाडाखालीं उभा होता वाट पहात :
तिनें थोडा उशीर केला :
फिरायला जातांना धुमसला,
बोलला नाहीं :
तिनें मनधरणी केली,
डोळ्यांवर येणारे त्याचे हट्टी केस

तिनें मागें केले, हुंगून घेतले,
आणि हंसून म्हणाली, "घुम्याजीराव, बोला आतां."
तो हंसला पोरासारखा पोट धरून...

आठवतांना त्याला वाटलें
सगळेंच हुकलें, स्वप्न फुटलें :
घासानें गंजिफ्रॉक पाठीला चिकटावें
तसें सगळें आयुष्य मनाला चिकटलें.
न बोलतां घुम्यानें तो धुमसला.
पंख्याचा वेग त्यानें वाढवला.
काळोखांत शिणून त्यानें डोळे मिटले :
दुखावलेल्या मुलासारखा न रडतां झोंपीं गेला

तिनें सगळें सैंपाकघर आवरलें.
घड्याळाला चावी दिली.
सकाळचा पेपर चाळला.
मग ती खोलींत आली.
त्याला सर्दी होईल म्हणून
तिनें पंखा बंद केला.
त्याच्या अंगावरतीं हलकेच
पातळ चादर ओढून घेतली.
डोळ्यांवरतीं आलेले
त्याचे केस तिनें हुंगले
आणि हलकेच मागें केले.
तिच्याही डोळ्यांवर झोंप आली :

तिनें हळूच डोळे मिटले :
उद्यांच्या भाजीसाठीं काय घ्यावें
याचा किंचित् विचार करीत
ती झोंपेंत बुडून गेली...

मुंबई
१३·४·६३

# मास्तर

मास्तरांनीं लाल पेन्सिल सांवरली आणि पुन्हां सांवरली.
मग त्यांनीं चष्मा पुसला. आणि पुन्हां एकदां पुसला.
अर्थ शिरत जाणाऱ्या अक्षरांच्या कावळेगर्दींत
मास्तर शिरले मार्क देत : दुखरे डोळे बारीक करीत.

तंबाखूचा व्यापारी, विमाएजंट, कंत्राटदार
(कर चुकवून) तिघांनीं विद्येचें मंदिर बांधलें :
कर्तृत्व असें थोर कीं त्या तिघांनीं
सट्टाबाजार, शाळा आणि आपलीं धोतरें सांभाळलीं.

मास्तरांच्या पायाखालीं गुळगुळीत लादी आली.
मास्तरांच्या टोपीवर शाळेचें छप्पर आलें.
ध्येयासारख्या पांढऱ्याशुभ्र खडूचे बारीक कण
मास्तरांच्या नाकांतून फुफ्फुसांच्या आंत गेले.

मास्तरांनीं लाल पेन्सिल सांवरली. आणि पुन्हां सांवरली
मग त्यांनीं चष्मा पुसला. आणि पुन्हां एकदां पुसला.

मुंबई
१५.६.६३

## जिवंत

म्हटलें तर भीति आहे, म्हटलें तर नाहीं.
सोड्यासारखा फसफसून येणारा चेव.
गरमगरम समरगीतें, मग कडक चहा.
साथीला प्रेरक बँड आणि कुरकुरीत शेव.

पावसाळा आला. गांवांतलीं कुत्रीं व्यालीं.
पुढाऱ्यांनीं पेंढा भरून तत्त्वें सांगितलीं.
व्यापाऱ्यांच्या ढुंगणांनाही खिसे फुटले.
झुंडीच्या पित्यांनीं मतें मागितलीं.

पाऊस खूप पडला. डुकरिणींनाही पिलें झालीं.
(लढणारे लढोत : रक्ताच्या नद्या वाहोत.)
आपण च्यायला कसे सुखी
आणि पुन्हां जिवंत आहोत.

मुंबई
१७.६.६३

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 94402
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
08300 दि:
9e04 नों. दि:

# माणूस

कदाचित् तो उभा असतो आपल्या पाठीशीं
पण आपल्या पाठीला डोळे नसतात :
आपण धांवतों पुढें हलकटांना शिव्या हांसडीत
स्वतःला वगळून : आणि आपले पाय फसतात.

कदाचित् तो असतो आपल्याजवळ, घरांतच,
किरकिरणाऱ्या हगुरड्या पोरांना धूत :
पण आपण चालत असतों बुद्धिवाद्यांच्या निसरड्यावर
आणि आपल्या रात्रींना कुत्र्यासारखी लागते लूत.

कदाचित् तो असतो कोपऱ्यांत, स्वतःशींच गुणगुणत :
जेव्हा घोकलेलें ओकतात सांस्कृतिक स्वातंत्र्याचे राखणदार :
आपण धांवत असतों त्यांच्यामागून रस्त्यांतून धांपा टाकीत
छापील कागदांत गोळा करीत बासे विचार.

कदाचित् तो एकटाच आपल्या तंद्रींत संध्याकाळीं
सार्वजनिक बागेच्या कडेकडेनें चालत असतो :
पोलिओनें पाय गेलेल्या एका अनोळखी मुलाशीं
जातां जातां हात हलवून हलकेच हंसतो.

मुंबई
२३·६·६३

# कंटाळवाणा दिवस

कंटाळवाण्या दिवशीं अचूक प्रेरणेनें
बायको नको असलेली भाजी घेते;
आळ्या पडलेल्या मनाला अचानक
विम्याच्या हप्त्याची आठवण येते.

कंटाळवाणा दिवस उगवतो तेव्हां
म्हाताऱ्याच्या पिरपिरीसारखा पाऊस पडतो :
न थांबतां एकसारखा न थांबतां
पाऊस पडतो आणि पाऊस पडतो.

कंटाळवाण्या दिवशीं आपल्याला
सिग्रेट ओढतांना कॅन्सर आठवतो;
वजन वाढल्याचा, पोट सुटल्याचा
साक्षात्कार रक्तदाब वाढवतो.

कंटाळवाणा दिवस उगवतो तेव्हां
सगळ्या स्वप्नांच्या जांभया होतात;
आयुष्याच्या दाढेंत जणूं काय दिवस अडकतो :
(कंटाळवाण्या दिवशीं अशा उत्प्रेक्षा सुचतात.)

कंटाळवाण्या दिवशीं आधीं कंटाळा येतो
मग कंटाळा येतो आणि नंतर कंटाळा येतो.

मुंबई
११·८·६३

# श्रद्धांजली

सुखी माणूस कालच मेला अचानक: वाचतांना
परराष्ट्रधोरणावरचा सडेतोड अग्रलेख. मरणापूर्वी
संपवली होती त्यानें कॅज्युअल रजा; भरला होता
विम्याचा हप्ता; विजेचें बिल; धोब्याचा हिशेब केला होता

सुखी माणूस पुढाऱ्यांच्या सभांना जाई;
विचारवंतांच्या परिसंवादांना इमानानें हजर राही;
आरोग्याच्या सुयोग्य जाणिवेनें कोठा साफ ठेवण्यासाठीं
दर पंधरा दिवसांनीं न चुकतां रेचक घेई.

सुखी माणसानें एकच नोकरी अखेरपर्यंत केली;
एकाच बायकोवर प्रेम केलें; एकाच पक्षाला मत दिलें;
फॅमिलीला घेऊन श्रद्धेनें दोनदां शिरडीला गेला;
दर शनिवारीं नेमानें मुलांना फिरायला नेलें.

कर्तव्यबुद्धीनें बचतरोखे घेऊन सुखी माणसानें
देशसेवा केली होती सांभाळीत महागाई;
रविवारीं त्वेषानें ताल धरून पायानें
तो स्वतःशींच लोकप्रिय समरगीतें गाई.

सुखी माणसाचे डोळे मिटले. देह लाकडासारखा
ताठ झाला. आतां कुणीहि जावो. कुणीहि येवो.
मरणापूर्वी सुखी होता. मरणानंतरही सुखी असावा.
ईश्वर मृताचे आत्म्यास शांति देवो.

मुंबई
३०·१०·६३

# आकाश कसें स्वच्छ आहे

(एस्० एम्० जोशी यांस)

संभ्या कामगार बेकार झाला. अन्यायानें. त्याच्यासाठीं
लढलें पाहिजे. साखरगांवच्या युनियनची उद्यां सभा :
पहांटेची गाडी आहे. चालायचेंच. सतरांदां पंक्चरलेल्या
टायरचे लाड कसले? रेटूं पुढें...

साठ वर्षें ओलांडून सकाळ आली. अंत असतो
वर्षांना : लढण्याला अंत नाहीं. स्वतःसाठीं
जगायला वेळ नव्हता. तडजोड कसली ? कुणाशीं ?

आकाश कसें स्वच्छ आहे.

स्वातंत्र्य आलें तरी गुलामीचा हाड्या ज्वर गेला नाहीं.
वखवख वाढली. शहाण्यांनीं टोप्या घेतल्या सोयिस्कर :
बदलल्या. फिरवल्या. विकल्या. आणि विकत घेतल्या.
लढतांना याचे केस वाऱ्यावर उडत होते : आतां पिकले.
पिकले पण थकले नाहींत. अजून खूप लढलें पाहिजे.

सार्वजनिक आयुष्याचें दार सताड उघडें असतें :
प्रत्येकाला प्रवेश आहे. जनतेचा हक्क आहे पिदवण्याचा.
आणि मतें विकण्याचा. शहाण्यांच्या बुडाखालीं
सत्तेची खुर्ची येते. लढणाऱ्याला पायपीट, संधिवात.
संध्याकाळीं सहाला संपासाठीं सभा आहे.

साठ वर्षें ओलांडून सकाळ आली. अंतर्मुख होऊन
चिंतन करणार होता—त्याच क्षणीं फोन वाजला :
अमका एक कार्यकर्ता आजारी. गेलें पाहिजे. आत्तांच येतों.
मग पुन्हां दौरा आहे. साठ वर्षें संपलीं का ?
अजून खूप चाललें पाहिजे, लढलें पाहिजे...अजून खूप...

आकाश कसें स्वच्छ आहे.

मुंबई
१७·११·६३

# एक एकटा मुलगा

संध्याकाळीं घरांतून आजोबा पाठवीत नाहींत :
म्हणतात, बाहेर अंधार होतो. घरांत जसा प्रकाश असतो !
आजोबांच्या तोंडांत असते लाळ आणि कडक शिवी.
आधीं लाळ. मग शिवी. मग लाळ. पुन्हां शिवी.
सूर्य बुडला. आजोबांचा डोळा चुकवून सटकलों.
आतां ते संतापतील. मग लाळ. मग शिवी.

समुद्रावर निघालों. वाळूंतल्या कुल्र्यांच्या
बिळांमध्यें घालण्यासाठीं काठी घेतली. वाटेनें
जातांना कण्हेरीच्या झाडाच्या कुल्ल्यावरतीं
काठी दिली अगदीं थेट मास्तरसारखी. एक
फूल खालीं पडलें. अंधार थोडा होऊं लागला.
पोटांत जरा गुरगुरलें. डरतो कोण ? हॅट् हॅट्...

सुरूच्या झांडांचें दाट रान. बुंध्यांना घट्ट
विळखा घातलेले सावल्यांचे जाड अजगर.
नभःप्रांगणीं एकदोन जलद होते. जलधीवर
उत्तुंग लहरी नव्हत्या. सकल तरुवर अवाक् होते.
पुस्तकांतले कठीण शब्द पटापट आठवले.
आजोबा तरी म्हणतात मला ठोंब्या. मग लाळ.
हॅट् हॅट्. सुरूच्या टांगेवर एक काठी लगावली.

खूप काळोख. थंड वारा. पोटांत जास्तच गुरगुरलें.
हातांतली काठी गरगर काळोखांत फिरवली.
हॅट् हॅट्. धूम धांवलों. वाटेंत एक बैलाचा
सांगाडा पडला होता. एक कुत्रा मधेंच भुंकला.
घर आलें. घरावर मांडी घालून काळोख
आपला बसला होता. आजोबा फिरत होते
ओसरीवर. त्यांना बघून ऊब वाटली.
आधीं त्यांची शिवी आली. मग लाळ. मग दोन्ही.
पण मला गळयाशप्पथ ऊब वाटली...

मुंबई
१८·१·६४

# वसा

आणि मग गाढव होऊन खूप खूप लोळावें
मनांतल्या मनांतच : म्हणजे हें मन एक उकिरडाच.
मुख्य म्हणजे सूख होतें : मनांतला विदूषक
मग आपल्याच यशावर पचापच थुंकत नाहीं.

उच्च मूल्यें विकणारा कोणी हुशार दुकानदार
(सांस्कृतिक स्वातंत्र्याचा सोल एजंट)
बसेल चढून मग चटकन पाठीवरतीं :
त्याला तसें बसूं द्यावें :
आपण आपले डोळे मात्र मिटून घ्यावे.
त्याच्याही पाठीवर असेल मोठा यशवंत दुकानदार
तो मात्र दिसणार नाहीं. बांधून हिंमत
लाळ घ्यावी देऊन आत्मा : एवढीच किंमत.
आणि मग कल्पनेंतली एकही टोचणी नाहीं,
मरणाच्या काठीवर जाणिवेचें लक्तर नाहीं.

असा वसा घेतल्यानें काय होतें ?
साठां उत्तरांचें यश पांचां उत्तरीं चालत येतें.

मुंबई
३०·१·६४

# खाज

कालचीं स्वप्नें शिल्लक उरलीं असलीं तर
झांकून ठेव : शिळ्या भाकरीसारखी त्यांना
चव असते. नासलेला जागेपणा सोसतांना
एखादें शिळें स्वप्न बरें असतें.

चिखल करून पावसाळे निघून जातात
याचेंच नांव वाढणें आणि शहाणपण.
करकचून बांधण्याचीं नातीं चालू असतांनाच
नवा चिखल करण्यासाठीं पाऊस येतो.
कालचा तो तिरडीवरचा कोणी माणूस :
मरण त्याचें खरेंसुद्धां वाटलें नाहीं,
भुरभुरलेले केंस त्याचे तसेच होते हुबेहूब :
वाटलें, चटकन् संवयीनें हात फिरवील...

काय नवें सांगितलें यांत, म्हणशील.
कांहींच नाहीं : भाषेचीच फक्त खाज :
तेवढ्यासाठींच ठेवलेंस तरी चालेल मला
कालचें एक शिळें स्वप्न झांकून आज.

मुंबई
१३·२·६४

## सोयिस्कर

आधीं भरून दिठींत ये,
अंमळशानें मिठींत ये,
सोयिस्कर असेल तसें:
मग-आधीं-तसें-असें.

भिंतीवरतीं असतात पाली,
तूं चल झाडाखालीं:
कीडमुंगी तिथें गावेल:
नको तेव्हांसुद्धां चावेल.
मला चावेल,
तुला चावेल.

आधीं भरून दिठींत ये,
अंमळशानें मिठींत ये.

मला काय हवें?
तुला काय हवें?
दोघांनाही ठाऊक आहे
तरी नजर भावुक आहे.
तुझी सोय, माझी सोय:
आतां चटकन् म्हण होय.
उघड्यावरच बरें प्रेम
पण तिथें लागेल नेम?
आणि नेम चुकला तर?
खेळ सगळा हुकला तर?

तर काय
पायांत पाय
पण शेवटीं तेवढेंच हवें :
त्याचसाठीं शब्द नवे :

आधीं भरून दिठींत ये,
अंमळशानें मिठींत ये,
मग-आधीं-तसें-असें
सोयिस्कर असेल तसें.

मुंबई
१४·२·६४

# ज्यांचीं हृदयें

ज्यांचीं हृदयें झाडांचीं
त्यांनाच फक्त फुलें येतात :
तेच वाढतात, प्रकाश पितात,
तेच ऋतू झेलून घेतात.

त्यांना मुळींच गरज नसते
व्याख्यानबाज कंठांची;
कानठळया बसवणाऱ्या
आध्यात्मिक घंटांची.

त्यांना माणूस शिडी नसतो
पाय ठेवून चढण्याची;
त्यांच्या कुशींत जागा असते
हरलेल्याला दडण्याची.

सत्तेवरतीं थुंकण्याचीही
त्यांना मुळींच सवड नसते;
निष्कपट ऊन त्यांच्याच
खांद्यांवर खेळत असतें.

ज्यांचीं हृदयें झाडांचीं
त्यांनाच फक्त फुलें येतात;
तेच फक्त गुच्छासारखा
पावसाळा हुंगून घेतात.

मुंबई
१४·२·६४

# शेपटी

माकडाला शेपटी असते.
गाढवाला शेपटी असते.
खाणाऱ्या वाघाला शेपटी असते :
त्याच्या पोटांत जाणाऱ्या
शेळीला शेपटी असते.
माणसानेंच कां बरें शेपटी टाकली ?
ऐवजीं अर्थशून्य शेंडी राखली ?

शेपटीची सोय असावी.
याला आणि त्याला असावी.
शेपटी कशी हलवतां येते,
आपल्या किंवा दुसऱ्याच्या
शेपटी पायांत अडकवतां येते,
विशेष म्हणजे
शेपटी चक्र घालतां येते.

मीं एकदां पाहिला एक 'क्लासवन्' माणूस
वरिष्ठाला म्हणतांना घोळून 'होय' :
तो सगळा शेपटीसारखा दिसत होता :
खरी शेपटी नसल्यानें केवढी गैरसोय !

शेपट्या असाव्या लहान-मोठ्या,
शेपट्या असाव्या खऱ्याखोट्या,
शेपट्या डोक्यावरून न्याव्या,
शेपट्या रंगवून घेता याव्या :

कधीं लाल
कधीं पिवळ्या
कधीं पांढऱ्या
कधीं भगव्या
कधीं असाव्या
नुसत्याच नागव्या :

हवी असेल सोय जशी
रंगवून घ्यावी शेपटी तशी.

मला वाटतें,
मूर्खांनाच शेपट्या नसतात.
यशस्वी शहाण्यांना शेपट्या असतात
पण ते त्या लपवतात.

प्रत्येक यशस्वी माणसाची
आपली शेपटी उगारण्याची
आणि शेपटी घालण्याची
जागा अगदीं स्वतंत्र असते.
पुष्कळदां ती जागा
दुसऱ्याला दिसत नाहीं
किंवा ती दिसेल म्हणून
डोळे मिटून घ्यावे लागतात.

मीं एकदां मूर्खासारखे डोळे उघडून
अध्यात्म सांगणाऱ्या एका धर्मशास्त्र्याची
ती जागा पाहिली :
देवाशप्पथ तिथें एक शेपटी होती :
तशीच शेपटी असणाऱ्या
सत्ताधारी मंत्र्यापुढें हलत होती!

आपण अगदीं लहान माणसें :
अशा वडील माणसांच्या
शेपट्या कधीं बघूं नयेत :
पण मीं ती पाहिली :
माझ्या मूर्ख उघड्या डोळ्यात अश्रू आले :
त्या क्षणीं माझे हात
होते साफ बांधलेले
तेव्हां मीं मनांत म्हटलें :
मनुष्याला जर शेपटी असती तर
त्याला आपले अश्रू आपल्या शेपटीनें
चटकन् पुसतां आले असते...

मुंबई
१६·२·६४

# उद्देशिका

सर्कशींतल्या हत्तीचा गुडघावाकला नमस्कार
बघतांना खदखदून हंसणाऱ्या
इवल्याइवल्या निर्मळांनो, तुमच्यासाठीं
कसलें जग ठेवतों आहोंत आम्ही मागें ?

वखवखलेली खुनी स्पर्धा. लाचार लाळ.
शेल्यांनीं पांघरलेली सिंहाची उग्र आयाळ.
सटोडियांनीं बांधलेली विद्या आणि संस्कृतीचीं
मंदिरें : आणि तिथल्या खुर्च्या अडवून
बसलेले धूर्त बडवे. गांधींच्या-केनडींच्या
छातीवर झाडलेलें राजकारण. हा सगळा
तुमच्यासाठीं ठेवलेला आम्हीं वारसा.

हा वारसा ठेवतांना
रोज आम्ही घेत होतों
झोंपेच्या हुकमी गोळ्या.
तो तिचा, ती त्याचा
धुमसत द्वेष करीत होती
तरी त्यांतच तुमची धारणा होत होती.
झोंपेच्या गोळ्या घेऊन पडलेलीं
भाडोत्री स्वप्नेंही होतीं कांहीं आमच्यापाशीं :
पण त्यांच्या लुळ्या गोष्टी कशासाठीं ?

सर्कशींतल्या हत्तीचा गुडघ्यावाकला नमस्कार
बघतांना मात्र तुम्ही खूपखूप हंसून घ्या :
तेवढें हंसूं मावण्याइतकी
माझ्या गाण्यांत जागा आहे :
अजून मीं ती भाड्यानें दिली नाहीं.

मुंबई
१८.२.६४

# प्रश्न

हिंवाळयांतल्या थंड उदास संध्याकाळीं
सूर्य पाण्यांत बुडतांना
मीं पाहिली बागेंतल्या बाकावर
एकटी बसून एक बाई रडतांना...

माणसें इतकीं एकाकी कां रडतात ?

मुंबई
१८.२.६४

# इथून जातांना

गुळगुळीत पथ स्वच्छ डांबरी,
वर मोटारी छेलछबेल्या;
इकडेतिकडे छान विखुरल्या
शेलाटी अन् स्थूल हवेल्या.

या रस्त्याच्या दोन्ही बाजुस
कुजणाऱ्या झोपड्या अभागी :
इथून जातांना संस्कृतिचें
अंग फाटतें भलत्या जागीं

मुंबई
१९.२.६४

## नांदी

गटार-गडग्यामधून आली
रुजून इवली पिंपळफांदी :
तांबुसहिरवा जन्म म्हणे हा
नव्या जगाची सूचक नांदी.

मुंबई
२०·२·६४

# घरें शिडें नसलेलीं

काळोखाचा खडक,
घरें शिडें नसलेलीं :
माणसें दिवे मालवून
सूख शोधीत असलेलीं :

अत्तर शिंपडलेलें सूख
मरणाजवळ आणणारें.
मठ्ठ घामट सूख
मरणाजवळ आणणारें.
वाजवून घेतलेलें सूख
मरणाजवळ आणणारें.
सक्तीनें शोषलेलें सूख
मरणाजवळ आणणारें.

पंख वासून कबूतर
वीजतारेला चिटकलेलें :
तसें एक एक मन
आयुष्याला लटकलेलें.

काळोखाचा खडक,
घरें शिडें नसलेलीं :
माणसें दिवे मालवून
सूख शोधीत असलेलीं.

मुंबई
२०.२.६४

# सकाळ

खिडकींतून कोवळें ऊन आंत यावें
तसा आला आनंद त्याच्या मनांत.
डोळे जेव्हां झोंपेंतून किलकिले उघडले
तेव्हां त्याला खिडकीच्या कोपऱ्यांतून दिसला होता
पंजाएवढा आभाळाचा निळा तुकडा.
एवढेंच. अगदीं एवढेंच. आणि कांहीं नाहीं.

खुर्चीत शीळ घालीतच तो उठला
मनांत घेऊन निळा तुकडा. गावेंसें
वाटूं लागलें : पण तो गप्प होता :
तारेवरून सरकत सरकत थेंब जावे
तसे त्याच्या मनांत सूर
हलत होते...हलत होते...त्याच्यापुरतेच.

चहाचा गरम घोट घेतांना
मांजराच्या पिलासारख्या पांढऱ्याशुभ्र कपाला
त्यानें हलकेच 'हॅलो' म्हटलें.
समोरच्या खिडकींतून कोवळें ऊन
मांजरासारखें भिंतीला पाठ घाशीत
असलेलें त्याला दिसलें.

खुर्चीत शीळ घालीतच तो उठला :
डावा आंगठा तुटलेली
चप्पल पायांत सरकवून बाहेर पडला :
त्याची आणि त्याच्यापुरतीच
असलेली ती सकाळ
पावसासारखी अंगावरतीं झेलून घेत...

मुंबई
२४·२·६४

# अलीकडे पलीकडे

भाजीची पिशवी घेऊन जातांना रस्त्यांतून
स्वतःला नकळतच स्वतःशीं तो हंसला.
नाकावरच्या घामानें चष्मा किंचित् घसरला :
पुढचा रस्ता एक क्षण धुक्यांत दिसला.

धुकें वाईट. खरें नसतें. रस्ता मात्र असतो खरा.
आणि पिशवी ठिगळासकट खरी असते.
लसूण आणि कोथिंबीर यांचे हिशोब खरे असतात.
चष्म्याच्या अलीकडचें कांहींदेखील खरें नसतें.

चार मुलें होण्याआधीं त्यानें प्रेम केलें होतें :
मनांतल्या मनांत तो पळूनदेखील गेला होता,
चाळीच्या जिन्यापाशीं ती बालद्या भरतांना
मनांतल्या मनांत तिचा गालगुच्चा घेतला होता.

हें सगळें चष्म्याच्या अलीकडे. चष्म्याच्या पलीकडे
श्रीकृपेंकरून त्याचें बँडसकट लग्न झालें :
श्रीहरी श्रीहरी म्हणत त्याच्या बापानें
अहेराचे पैसे नीट मोजून घेतले.

आणि मग चाळीमधल्या दोन खोल्यांत
श्रीकृपेंकरूनच चार वेळां सुईण आली;
स्वप्नांच्या कॉलरी यथाकाल उसवल्या
आणि लग्नामधली पँट नको तिथें फाटून गेली.

भाजीची पिशवी घेऊन जातांना रस्त्यांतून
मनांतल्या मनांत त्यानें आत्महत्या करून टाकली :
हें सगळें चष्म्याच्या अलीकडे. चष्म्याच्या पलीकडे
पिशवीमधें भाजी भरून मोड नीट मोजून घेतली.

मुंबई
२४.५.६४

# रोमँटिक

मागें वळून पाहिलें तर
कदाचित् मान लचकेल :
तरीपण मागें वळून
पहावेंसें कां वाटतें ?
पहावेंसें तुलामला
तेव्हां तसें जातांना
डोळे गुंफून, थरथरून.

आजूबाजू घरें कशीं
टवटवीत होतीं तेव्हां.
झाडें होतीं. स्वच्छ रस्ते.
आपण दोघें. मोकळेंपण.
असण्यांतला प्रत्येक सूर
भिडत होता. रंगून जाऊन
जगण्याची लाज नव्हती.
शर्टाच्या खिशांत माझ्या
सिगारेटचें पाकीट आणि
चंद्र होता. आपण दोघें.

मागें वळून पाहिलें तर
कदाचित् मान लचकेल :
तरीपण मागें वळून
पहावेंसें कां वाटतें ?

मुंबई
२·६·६४

# फोड

तांबूसपिवळा एक फोड
पाठीवर टरारला :
माजलेला बेडूक बसतो
विहिरीच्या कांठावर
तसा बसला पाठीवर.
अयाईगऽ केवढा ठणका :
फुटणार वाटतं पाठीचा मणका.
बोंबललों ! पण मला
माझाच आवाज ऐकूं आला.

ठणका कमी होण्यासाठीं
मीं खूप यत्न केले :
एका मोठ्या डॉक्टरनें
मला नीट तपासलें :
तीस रुपये घेतल्यावर
नमुन्याला कालच फुकट आलेलें
एक औषध लिहून दिले.

ठणका कमी होण्यासाठीं
मीं पुन्हां यत्न केले :
हळूच एक गाणें म्हटलें.
शिरडीला नवस केला
पण तोही फुकट गेला.
मग मीं कावळ्याकडे पाहिलें

मग मीं चिमणीकडे पाहिलें.
एकदोनदां (स्वतःच्या) बायकोकडे पाहिलें.
आयईगऽ केवढा ठणका :
फुटणार वाटतं पाठीचा मणका...

बायकोपोरें म्हणालीं अरेरे
आईबाप म्हणाले अरेरे
हा-तो म्हणाले अरेरे.
पण सगळा फुकट गलका :
ज्याला फोड त्यालाच ठणका.

ख्रिस्तबुद्धगांधी यांना
असला फोड येता तर ?
कोण जाणे कदाचित्
आला असेल :
इतिहासांत फोडांची नोंद नसते.
अयाईगऽ केवढा ठणका :
फुटणार वाटतं पाठीचा मणका...

ठणकाच फक्त पसरला
आणि त्यांत खिडक्यादारें वितळलीं,
नातींगोतीं वितळलीं.
अस्तित्व सगळें व्यापून
ठणकणारा फोडच उरला :

आध्यात्मिक पूर्णावस्थेंत
ब्रह्म जसें जाणवतें
अगदीं तसा, तितकाच खरा
फोड फक्त जाणवला :

ठणकणारा तांबूसपिवळा
एक फोड
आणि मी अगदीं एकटा.

मुंबई
६.६.६४

# महावृक्ष

महावृक्ष कोसळल्यावर जमीन दिसते भयानक
विधवेच्या कपाळासारखी. इवलींइवलीं केविलवाणीं
पांखरें मग रडूं लागतात : पण त्यांचे गुदमरलेले
आवाज मात्र ऐकूंही येत नाहींत : कारण तेव्हां
नाटकी रडें रडणाऱ्या कोल्ह्यांचीच कुई फक्त
घुमत असते : वाऱ्यावर वाजत असतात
तिच्याच फक्त नव्यानव्या तबकड्या.

महावृक्ष कोसळल्यावर खुरट थिट्या झुडपांची
उंची भलतीच जाणवूं लागते. इतिहासाचीं
जुनीं पुस्तकें विकणारा रद्दीवाला जसा पेलतो
ऐतिहासिक घटनांचा भव्य भार : तशींच हीं
थिटीं झुडपें पेलूं लागतात आकाश आपल्या डोक्यावर.

महावृक्ष कोसळल्यावर पूर्वपश्चिमदक्षिणउत्तर
गिधाडांच्या चीत्कारांचीं पत्रकें निघूं लागतात :
त्यांची एक नजर असते खिळलेली बैलावर.
त्याच वेळीं व्यापाऱ्यांच्या मनांत होतात हिशेब सुरू :
लाकडांच्या फळ्यांसाठीं, बुंध्याच्या ओंडक्यांसाठीं.

महावृक्ष कोसळल्यावर शरम वाटते
आपण त्याला शोषल्याची.
आपला बुटकेपणा जाणवून मग आपण दचकतों.
सूर्यबिंब पकडणाऱ्या त्याच्या फांद्या आठवतात,
चंद्र भाळीं धरणारी त्याची उंची जाणवते :
आणि मग आकाश आपल्या डोक्यावर
पेलणाऱ्या कांटेरी झुडपांची भीति वाटते
त्यांचे हात आपलीं धोतरें ओरबाडतील यासाठीं.

मुंबई
१०·६·६४

# प्रौढगीत

एका बुलंद माणसाचे
संकल्प होते छातीचे.
केलें होतें देवाजीनें
बूड त्याचें मातीचें.

संकल्पांच्या नशेंत तो
एकदां जोरांत बसला खालीं :
माती त्याच्या बुडाची
माठासारखी फुटून गेली.

संकल्प जरी त्याचे छातीचे
बूड त्याचें केलें होतें मातीचें.

मुंबई
२१·६·६४

# एक मोरू

आधीं त्यानें पाय पाहिले चांचपून भक्तीनें
डोंगरउंचीच्या माणसांचे : ठिसूळ ढेकळेंच
लागलीं त्याच्या हाताला. मग त्यानें
आत्मे पाहिले चांचपून नांवाजलेले :
शेंबडासारखे गिळगिळीत. तो अगदीं
चाटच झाला : त्याला वाटलें, आपण मोरू.

मग त्यानें आपलीच पाठ पाहिली
बावळटपणें चांचपून : तिथेंच होतें
त्याचें ओझें : तें खरेंच जड होतें :
कारण त्याच्या पाठीला लागलेली
रग अगदीं खरी होती, त्याची होती.

आणि मग तो चालूं लागला
एकट्या एकट्या रस्त्यानें
एकटा एकटा एक मोरू...

मुंबई
२·७·६४

# लगीन

आणखी कांहीं दिवसांनीं
समोरच्या पांगाऱ्यावर
लाल पिंजर उपडी होईल
आणि तेव्हां
'आतां'चें 'मग'शीं लगीन होईल...

आणखी कांहीं दिवसांनीं
फुलांचीं डेखें डेखें
फूलपांखरूं हुंगीत जाईल :
आंतल्या आंतल्या केसरांना
गुदगुदल्यांची दुशी देईल
आणि तेव्हां
'आतां'चें 'मग'शीं लगीन होईल...

मुंबई
१२.७.६४

# एक टीकाकार : काल्पनिक

अहंतेच्या हलत्या पाळण्यांत त्यानें हलकेंच
किरकिरणारें आपलें मन झोंपवलें.
त्याला मात्र झोंप मुळींच येईना. अलीकडे
येत नसे. चारमिनार पेटवली. उग्र कडवट
धूर सोडीत किरकिरणाऱ्या मनाला झोका दिला.

कांहींतरी क्रांतिकारक उलथापालथ करून त्याला
वळवळणाऱ्या नजरांचें लक्ष्य होणें भाग होतें.
प्रतिष्ठित लेखक साले माजतात खूप :
सगळ्या खुर्च्या अडवून बसतात. तो आवाज
उठवणार होता : रबर घेऊन छापील नांवें
खोडणार होता : नवीं नावें खोदणार होता.
मध्यभागीं ह्याचें नांव ठळकणार होतें.

किरकिरणाऱ्या मनाला त्यानें हलक्या हातांनीं
पुन्हा एक झोका दिला. संवयीनें.

फडताळाच्या शेजारीं उदासलेल्या भिंतीवरून
चार ढेकूण निरुद्देश फिरत होते.
उठून त्यानें फडताळांतून एक पुस्तक
बाहेर काढलें. वाचूं लागला. 'अस्तित्ववाद',
'लॉजिकल पॉझिटिव्हिझम' : दोन शब्द त्यानें
चटकन् चिमटीमधें पकडले खूष होऊन.
अर्थाचें मग पाहूं : सध्यां शब्द बरे होते.
प्रतिष्ठित लेखक साले माजतात खूप...

त्यानें कोपऱ्यांत पाहिलें : एक झुरळ
अंग ढकलीत धिटाईनें पुढें गेलें.

पेनमधें शाई भरून मग तो लिहूं लागला.
आणि तो लिहूं लागला. उद्यांच्या डाकेनें
टीकालेख जायलाच हवा : माजलेले गांडूळ
मग चकरावून वळवळतील. मध्यरात्र उलटली.
तरी तो लिहीत होता. आणि तो लिहीत होता.
पहांटे नकळत डोळा लागला. खुर्चीवरच.
किरकिरणारा पाळणा आतां थंड होता.

फडताळाच्या शेजारीं उदासलेल्या भिंतीवरून
चार ढेकूण निरुद्देश फिरत होते.

मुंबई
१९.९.६४

# एकामेकांशिवाय

आपण असतों उभे एकामेकांजवळ
एकामेकांशिवाय. तरीही ओळखतों
भुकेचे वास. इच्छांचे वळसे.
हिशोब करीत करीत जपूनच
घसरतों. गरजांच्या मिठ्यांनीं
गरजाच प्रसवतों. आणि यांतलें
नसतें कांहींच आपल्या स्वाधीन.
एकामेकांजवळ. एकामेकांना.
एकामेकानें. एकामेकांहून.
एकामेकांआंत : एकामेकांशिवाय.

असेच बसलात प्रत्यय
स्वार होऊन सगळे
उपाशी भाषेवर : आणि असा
चालतो आशयाचा प्रवास.
एकादाच अवलिया भाषेच्या
देशांतून परागंदा होतो :
अज्ञात काळोखांतला
अचानकपाऊस
शब्दहीन एकांतांत
फांदी होऊन पितो :

त्याला आपण पुरतों :
दैनिक पेपरांच्या डोंगररद्दीखालीं.
पों पों पीं पीं ट्रिंग ट्रिंग
खट् खट् हॅलो हॅलो हॅलो
एकामेकांजवळ. एकामेकांना.
एकामेकानें. एकामेकांहून.
एकामेकांआंत : एकामेकांशिवाय

मुंबई
१५.१०.६४

# ज थ्या ज थ्यां नीं

जथ्याजथ्यांनीं हीं माणसें ऐकतात
व्यापारी रेडिओनें शिंकरलेलीं गाणीं :
ज्या गाण्यांत असतात हलवलेले कुले,
झुलवलेलीं स्तनें, टूटे हुवे दिलके
भाडोत्री सुस्कारे, डबाबंद अश्रू.

व्यापारी रेडिओचे सांस्कृतिक लेकावळे
ट्रान्झिस्टर घेऊन रस्त्यानें हिंडतात :
अमक्या ब्रशानें आपले दांत घांसा.
तमकी पावडर आपल्या तोंडाला फांसा.
अमुक गोळ्या घ्या जुलाब होण्यासाठीं.
तमुक वड्या खा डोकें थांबण्यासाठीं.
आधीं एक गाणें मग एक गाणें :
दोन गाण्यांमधें जुलाबाच्या गोळ्या.
खरीद लो खरीद लो बेहतरीन इलाज...
आणि मग रस्त्यावर भव्य लावलेल्या
नटीच्या पोस्टरच्या नेमक्या जागेवर
नेम धरून टाकतात पानाची पिंक...

जथ्याजथ्यांनीं हीं माणसें ऐकतात
व्यापारी रेडिओनें शिंकरलेलीं गाणीं :
जेव्हां मिळत असते समोरच्या फूटपाथवर
केशवसुतांची समग्र कविता फक्त चार आण्यांत.

मुंबई
१९·१०·६४

# ह र व ले ला

राक्षसाच्या लांबलचक जांभईसारख्या
बस्‌च्या रांगेंत तो माणूस उभा होता.
दैनिकाची घडी नीट खोवलेली पिशवी
त्याच्या हातांत होती. त्याच्यापुढें
पारशी होता : छत्री आपली रायफलसारखी
खांद्यावरतीं घेतलेला—पुतळ्यासारखा :
खांद्यावर कावळे तेवढे शिटायचे बाकी होते.

बघतां बघतां झटक्यासरशीं त्यानें पिशवी
उघडली : थिजलेल्या वासनांची कजाग बायको
त्यानें पिशवीमधें कोंबली. आणि नंतर
पटापट झालेलीं पांच पोरें. ठणाणा
रेडिओ लावून बसणारा शेजारी.
कंपनीचा लफडेबाज एक्झिक्युटीव्ह :
(गाण्यांच्या मैफलींत सर्वांत पुढें बसणारा)
या सगळ्यांना पिशवींत कोंबून
त्यानें टाकली वर एक मेथीची हिरवी जुडी
आणि पिशवी बंद करून मजेंत टांगली
पुढल्या खड्या पारशाच्या छत्रीला.
आणि मग तो हरवला बस्‌च्या रांगेंत...

हरवला. आणि मग त्याला दिसली
उजवीकडली छोटी बाग
हिरव्यागार कांचेसारख्या गवताची;

उन्हाच्या पारदर्शक रेशमी तंवूंत
थुय्थुय्णारी कारंजाच्या पाण्याची
रुपेरी सर्कस त्यानें पाहिली;
गोजिरवाणीं मुलें बागेंत फिरत होतीं;
फुलांच्या घडवलेल्या बायका बागेंत फिरत होत्या;
चणेवाल्याच्या टोपलींतल्या
ओंजळीएवढ्या मडक्यांतून
धूर उंच जात होता :
परीकथेंत असतो तसा :
स्वप्नांच्या नवलनगरींत जाणारा, नेणारा—

तो जरा पुढें झुकला : पारशाच्या
रायफलसारख्या छत्रीचा दांडा
त्याच्या नाकावर आदळला :
आणि त्याला आपले पाय जाणवले,
पायाखालचा पिंकसुकला
रस्ता त्याला जाणवला,
हरवलेंपण हरवल्याचें जाणवलें
आणि तो बस्च्या रांगेंत
निमूट पुढें सरकूं लागला...

मुंबई
१५·११·६४

REFBK-0015582
REFBK-0015582

# जेव्हां आपण प्रेम करतों

जेव्हां आपण प्रेम करतों
तेव्हां आपल्या शर्टाला खिसा नसतो.
तो तिचा असतो.
ती त्याची असते.
कुरूप गवयी रंगून गातांना
जसा सुंदर दिसतो
तसे आपण सुंदर असतों.
जेव्हां आपण प्रेम करतों
तेव्हां आपण आपण नसतों :
आपण असतों कोणी अनोखे जादूगार :
कंडम बरगड्यांत
गंधू उतूं जाणारी फुलबाग फुलवणारे.

कधींतरी केव्हांतरी कोणे एके काळीं
प्रेम करावें. असलें जरी सांकेतिक तरी
त्यानें तिच्या फिकट चेहऱ्याला मुखचंद्र म्हणावें.
त्याला असला पंचाहत्तर बेसिक तरी
तिनें त्याला हांक घालावी 'राजा' म्हणून.
तिच्या वाढदिवशीं त्यानें आणावा आठवणीनें
पाणी मारलेला जुईचा गजरा सहा पैशांचा
(चांगल्या वस्तींत तो रात्रीं स्वस्त मिळतो).
सहा बाय् सहाच्या खोलींत पोपडे उडालेल्या
लंगड्या टेबलाजवळच्या गंजल्या खाटेला
त्यांनीं दोघांनीं म्हणावें 'शयनमहाल'.
हें सगळें शपथ सांगतों अगदीं खरें असतें :

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
बा. क्र. 95482
... शाखा (स्थळ प्रत)

कारण जेव्हां आपण प्रेम करतों
तेव्हांच आपण खरे असतों चुकून एकदां.

जेव्हां ती प्रेम करते
तेव्हां ती त्याला गाणें म्हणून दाखवते
कांपऱ्या बेसूर आवाजांत :
त्यालाही ते सूर दिसतात पोपटी पालवीसारखे :
कारण तेव्हां तीच एक गाणें असते.
कारण तेव्हां तोच एक गाणें असतो.

मग पुढें जीभ भाजते, ओठ करपतात,
शिळ्या भज्यांचे करपट ढेकर येतात आयुष्याला,
तोंडांत दाटून येते कडू द्वेषाची थुंकी
पण तो थुंकत नाहीं जगावर :
एकदां तरी गिळून टाकतो समजुतीनें :
कारण तिनें शिवलेले असतात त्याचे—तिच्या राजाचे—
दोनच फाटलेले जर्जर शर्ट पुन्हां पुन्हां
आणि तिच्या ठिगळ लावलेल्या पदरानें
ह्यानें सांधलेलें असतें एक आभाळ.

मुंबई
२१·११·६४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 68300 दि: ...
क्रमांक 7004 नोंद दि: 20131607